

# ऊर्जा बचतीसाठी अदानी इलेक्ट्रिसिटीकडून अभिनव उपक्रम

**मुंबई** : ऊर्जा बचत करण्यासाठी निवासी ग्राहकांना सुलभ संधी मिळावी यासाठी अदानी इलेक्ट्रिसिटीने कमी वीज वापर करणाऱ्या उपकरणाच्या वितरणासाठी पुढाकार घेतला आहे. मागील वर्षी अदानी इलेक्ट्रिसिटीच्या या उपक्रमाला ग्राहकांनी उत्तम प्रतिसाद दिला होता. निवासी ग्राहकांना अनुदानित खर्चामध्ये २५ हजार ऊर्जा कार्यक्षम ५ स्टार सिलिंग पंखे व ६,५०० रेफ्रिजरेटर्सचे वितरण केले होते. यंदा ५० हजारांहून अधिक सिलिंग पंख्यासह हा उपक्रम अदानी इलेक्ट्रिसिटीने हाती घेतला आहे. बाजारपेठेमध्ये ऊर्जा बचत करणाऱ्या उपकरणांची किंमत अधिक असल्याने एईएमएलने खरेदीवर २५ ते ३० टक्क्यांनी रिबेट देत ही उपकरणे अधिक सुलभपणे उपलब्ध करून दिली आहेत. एईएमएलच्या प्रवक्त्यांनी या उपक्रमाचा लाभ निवासी ग्राहकांनी घेण्याचे आवाहन केले आहे. प्रत्येक घरांमध्ये दिवसातून सरासरी १० ते १२ तास सिलिंग पंख्याचा वापर केला जातो, कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि कमी वीज वापरासाठी ही उपकरणे उपयुक्त ठरणार आहेत. अदानी ग्राहक १९१२२ या क्रमांकावर कस्टमर केअरशी संपर्क साधून या उपकरणासाठी नोंदणी करू शकणार आहेत. स्थिर वीज वापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि हरित तंत्रज्ञानाप्रति परिवर्तनाला चालना देण्यासाठी हा ऊर्जा बचत उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.